ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लोकप्रशासनात विकास प्रशासनाची भूमिका




प्रा.डॉ.मोरे मंचक रंगनाथराव
लोकप्रशासक विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड.

आधूनिक काळात लोकप्रशासनशास्त्राच्या अभ्यासात विकास प्रशासनाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झझले आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विकास प्रशासनाच्या अभ्यासाची सुरूवात झाली. १९५१ साली गोस्वामी यांनी विकास प्रशासन या संकल्पनेचा उल्लेख प्रथम केला. यानंतर फ्रेड. डब्लिव रिग्ज एडवर्ड डब्लिव विडनर जोसेफ ला पोंबरा, अल्बर्ट वाटरसन अरोरा डोनाल्ड सी. स्टोन, फेनसोड ड्विट वाल्डो या विचारवंतांनी विकास प्रशासनाच्या अभ्यासाला चालना दिली. "विकास प्रशासन या संज्ञेमध्ये दोन भिन्न परंतू परस्पर संबंधित प्रवाह आढळून येतात."[१] शास्त्रीय व्यवस्थापनाचा पहिला विचार प्रवाह की, ज्याद्वारे प्रशासनात सुधारणा करण्यासाठी शास्त्रीय दृष्टीने व्यवस्थापनाचा विचार केला जातो. प्रशासनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासकीय सुधारणा करण्याच्या उद्देशाने प्रशासनाच्या साधनांचा शास्त्रीय पध्दतीने वापर करण्यावर विशेष भर दिला जातो. त्यामूळे प्रशासनात योग्य ती काटकसर व कार्यक्षमता निर्माण होऊन प्रशासनाचे उद्दिष्ट आपोआपच साध्य होते अशी समजूत होते. साहजिकच प्रशासनाच्या उद्दिष्टांपेक्षा प्रशासकीय साधनांवर अधिक भर दिला जातो आणि प्रशासनाच्या उद्दिष्टांचा विसर पडतो. साधनाला साध्यापेक्षा अधिक महत्व दिल्यामूळे प्रशासन असफल ठरते. प्रशासकीय सिध्दांतातील ही उणीव भरूण काढण्याचा हेतूने एडवर्ड विडनरने विकास प्रशासनाची संकल्पना मांडलेली आहे. विकास प्रशासनाच्या संकल्पने निर्मिती मागील दुसरा प्रवाह म्हणजे १९३० च्या दरम्यान जी आर्थिक मंदिची लाट आली तिच्यातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय नियोजन व शासकीय हस्तक्षेपाची आवश्यकता निर्माण झाली.

## विकास प्रशासनाच्या व्याख्या:—

विकास प्रशासन हा विकास आणि प्रशासन या दोन शब्दांपासून बनलेला आहे. विकास या शब्दाचा अर्थ सतत पुढे जाणे आणि प्रशासनाचा अर्थ सेवा किंवा सेवेसाठी व्यवस्थापित करणे असा आहे. शाब्दिक, अर्थाने विकास प्रशासनामध्ये जनतेच्या सेवेसाठी विकास कामे करणे समाविष्ट आहे. म्हणून विकास प्रशासनाचा अर्थ विकास कार्यक्रमांचे प्रशासन आणि विकासाच्या उद्देशाने सरकार ने तयार केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्याचा मार्ग होय.

## विकास प्रशासनाच्या व्याख्या :—

### १) प्रो. ए. वेडनर :

प्रो.ए. वेडनर यांच्यामते विकास प्रशासन संस्थेला राजकीय आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या दिशेने मार्गदर्शन करते. ते प्रामूख्याने कार्याभिमूख आणि ध्येयाभिमूख प्रशासकीय प्रणालीवर भर देते.[२]

### २) रिग्ज :

रिग्ज यांच्यामते विकास प्रशासन दोन परस्पर संबंधित स्वरूपात केले जाते. प्रथम विकास प्रशासन हे विकास कार्यक्रम, प्रणाली, मोठया संस्था विशेषत: सरकार राबवत असलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीशी संबंधीत आहे आणि त्या धोरणाच्या विकासात्मक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी तयार केलेल्या योजनाच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे. दूसरे प्रशासकीय क्षमता अप्रत्यक्षपणे विकास आणणे देखील आहे या अंतर्गत समाविष्ट आहे.[३]

### ३) माँटेगोमोरी :

देशाचा नियोनबध्द आर्थिक विकास आणि विशिष्ट मर्यादिपर्यंत राज्याच्या सामाजिक सेवांत सुधारणा करणे यास विकास प्रशासन असे म्हणतात.[४]

### विकास प्रशासनाची भूमिका:

विकास प्रशासनाचा संबंध समाजातील व्यक्ती, संस्था, संघटना यांच्याशी येतो. दुसऱ्या महायूध्दानंतर जगातील बहूतेक सर्व राज्ये स्वतंत्र आणि सार्वभौम बनली. साम्राज्यवादाचा आणि वसाहतवादाचा अस्त झाल्यानंतर नव समाज, नव राष्ट्र यांची निर्मिती झाली. हया नव्या उदयोन्मूख राष्ट्रांनी कल्याणकारी राज्य निर्मितीचा मार्ग स्विकारला. प्राप्त नैसर्गिक साधन सामग्री तिचा परिस्थिती सापेक्ष योग्य वापर आणि त्यासाठी कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा याद्वारे प्रत्येक राज्य आपला विकास साधण्याचा प्रयत्न करू लागले. तिसऱ्या जगातील विकासनशील राष्ट्रांनी विकास प्रशासनाचे धोरण स्वीकारले. विकसनशील राष्ट्रांनी हे ओळखले की जलदगतीने परिवर्तन बदल आणि सुधारणा घडवून आणल्याशिवाय राष्ट्रांचा सर्वांगीण विकास होणार नाही. राष्ट्रांनी नियोजन बध्द कार्याला अधिक महत्व दिले. त्यांनी जून्या पारंपारिक प्रशासकीय पध्दतीचा त्याग करून नव्या शास्त्रशुध्द वास्तववादी तांत्रिक पध्दतीचा स्वीकार केला. त्यामूळे विकास प्रशासनाचे स्वरूप व्यापक बनले.

### विकास प्रशासनाची भूमिका:—

#### १) राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे बाहय आक्रमण व अंतर्गत कलह यापासून संरक्षण करणे:—

बाहय आक्रमण व अंतर्गत कलह यापासून राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण करण्याची महत्वपूर्ण जबाबदारी शासनाला पार पाडावी लागते. लोकांच्या जिविताची आणि वित्ताची काळजी घेणे, त्यासाठी संरक्षण व्यवस्था उभारणे हे राज्याचे प्रथम कर्तव्य असते. प्रगत विकसित राष्ट्रे आपल्या संरक्षणावर बराच पैसा खर्च करीत असतात. अप्रगत विकसनशिल देशानांदेखील आर्थिक कुवत नसताना संरक्षणावर खर्च करावा लागतो. कारण राज्यातील लोकांना संरक्षण देऊन त्यांना जिविताची व वित्ताची शाश्वती द्यावी लागते.

#### २) राष्ट्रीय ऐक्य व एकात्मतेची भावना वाढविणे:—

सामान्यत: धर्म, वंश, भाषा, वर्ण, जात, प्रादेशिकता यामूळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहचतो. तेव्हा या विविधतेतून एकता निर्माण करण्याचे महत्व पूर्ण कार्य विकास प्रशासनाला करावे लागते. राष्ट्र बांधणीला राष्ट्र विकासाला पुरक असे राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता वाढवण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. भारतात विविध जाती धर्माचे, भाषेचे लोक राहत असून या विविधतेत राष्ट्रीय एकात्मता जोपासलेली आहे. राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्र सेवा, राष्ट्राभिमान या गोष्टी जनतेत निर्माण करून जनतेचा पाठींबा मिळविणे हे कार्य विकास प्रशासनाला सातत्याने करावे लागते. “एकता ही राष्ट्राची खरी शक्ती आहे आणि हीच खरी देशभक्ती आहे. एकता हाच राष्ट्राचा आत्मा आहे. जर देशात एकात्मता असेल तर आपण देशाच्या सर्व योजना पुर्ण करू शकतो. एकात्मतामूळे केवळ एकताच नव्हे तर उद्योग, कृषी विज्ञान अशा विविध क्षेत्रात प्रगतीची दारे उघडू शकतो.”[५]

### ३) आधूनिक विज्ञान, तंत्रज्ञानाचा स्विकार करणे:—

अप्रगत विकासनशील राष्ट्रांनी आपल्या विकास प्रशासनाच्या व्यवस्थेत आणि कार्यात नवनविन तंत्राचा वैज्ञानिक पध्दतीचा स्वीकार करून प्रगती साधली पाहिजे. आधूनिक काळातील नवीन ज्ञानाचा तंत्राचा वापर करून राज्यशासनाने विविध क्षेत्रात विकास घडवून आणला पाहिजे. अमेरिका, इंग्लंड, जपान, जर्मनी, फ्रांस या प्रगत देशातील तंत्रज्ञानाचा शास्त्रीय पध्दतीचा वापर करून विकसनशिल राष्ट्रांनी आपला सर्वांगीण विकास साधवा असे आवाहन व सहकार्य आंतरराष्ट्रीय संघटनेने केलेले आहे." मानव जातीच्या उत्कर्षासाठी जीवनशैली सुधारण्यासाठी आपल्याला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा कायमचा आधार घ्यावा लागेल जर आपण संगणक इंटरनेट, वीज, इत्यादी. तंत्रज्ञानाची मदत घेतली नाही तर आपण भविष्यात आर्थिक दृष्ट्या बळकट होऊ शकत नाही आणि अशा स्पर्धात्मक व तंत्रज्ञानाच्या जगात आपण टिकून राहू शकत नाही."[६]

### ४) जनतेचा सहभाग वाढविणे:—

राष्ट्र उभारणीचे, राष्ट्र विकासाचे कार्य करण्यासाठी अदयावत विकास प्रशासनाची आर्थिक साधन सामग्रीची जशी गरज असते तशी जनतेच्या सहकार्याची व पाठीब्यांची गरज असते. ज्यांच्यासाठी विकास घडवून आणावयाचा असतो त्यांचा पाठींबा सहभाग आणि सहकार्य मिळवणे आवश्यक असते. विकास योजना आणि कार्यक्रम राबताना शासकीय यंत्रणेबरोबर जनतेचा सहभाग आणि सहकार्य आवश्यक असते. " शांतता आणि अहिंसेचे वैश्विक प्रतीक असलेल्या महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंती निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक उच्चस्तरीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेत संयूक्त राष्ट्राचे सरचिटणीस अन्तोनियो गुतारेस म्हणाले की, आपले प्रत्येक धोरण आणि कृती योग्य आहे की नाही हे तपासून पाहण्याचा चमत्कारी धागाच आपल्याला महात्मा गांधी यांनी या मूल्यांतून दिला आहे. आपण करत असलेली कृती गरीबातल्या गरीब व्यक्तीचे आयूष्य प्रतिष्ठा आणि भाग्य वाढवण्यास उपयूक्त ठरेल की नाही हे तपासण्याची ही किल्ली आहे. सार्वजनिक स्वच्छता, मातांचे आरोग्य प्राथमिक शिक्षण लैंगीक समानता, महिला सक्षमीकरण भूकबळीचे प्रमाण कमी करणे, शाश्वत मूल्ये आणि सहस्त्रक मूल्ये तयार करण्याच्या किती तरी आधी गांधीजींनी आपल्या जीवनकार्यातून दिलेल्या आदर्शांच्या आधारावर विकास करताना त्यात जनसहभाग वाढवणे या सगळयाचे मार्गदर्शन गांधी यांनी केले आहे."[७]

### ५) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्राची पत, प्रतिष्ठा व महत्व वाढविणे:—

कोणतेही राष्ट्र स्वतंत्रपणे ईतर राष्ट्रांचे सहकार्य न घेता प्रगती करू शकत नाही. राष्ट्राराष्ट्रांत आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक, व्यापारविषयक असे संबंध असतात. परस्परांना सहकार्य करून साधनसामग्री आणि विचारांची देवाणघेवाण करून विकास साधण्याकडे प्रत्येक राष्ट्राचा कल असतो. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपल्या राष्ट्राची पत, प्रतिष्ठा कशी वाढेल याविषयी राज्य शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. "परराष्ट्रांशी मैत्रीचे, सलोख्याचे संबंध ठेवून आंतरराष्ट्रीय शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या कार्यात मदत केली पाहिजे."[८] या दृष्टिकोनातून विकास प्रशासनाची भूमिका महत्वाची ठरते.

### संदर्भ सुची:—


१) प्रा.बी.बी.पाटील, लोकप्रशासन फडके प्रकाशन, कोल्हापूर २००६, पृष्ठ क्र.४१०
२) Kailasheducation.com
३) scotbuzz.org
४) प्रा.बी.बी.पाटील, लोकप्रशासन फडके प्रकाशन, कोल्हापूर २००६, पृष्ठ क्र.४१४
५) Marathimadat.com
६) Marathimol.in/science and t…..
७) pib.gov.in
८) प्रा.बी.बी.पाटील, लोकप्रशासन फडके प्रकाशन, कोल्हापूर २००६, पृक्र.४२४